पोलिस निरीक्षक
माणगांव - रायगड

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** माणगांव **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0227 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/08/2022 14:07 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 26/05/2022

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/05/2022

**Time From (वेळेपासून):** 14:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:30 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/08/2022 **Time (वेळ):** 14:07 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 015 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/08/2022 14:07 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** माणगाव पोलिस ठाणे येथे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** मयुर दिलीप शेठ

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | इतर | nil nil nil |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं 773 ,खांदाड, ,तामाणगांव,माणगांव,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर नं 773 ,खांदाड, ,तामाणगांव,माणगांव,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9339777777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती कुंजन जाधव | | | 1. नेमणूक माणगाव,माणगांव,रायगड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी श्री.मयुर दिलीप शेठ, वय- 38 वर्षे, व्यवसाय -व्यापार रा.श्रीगणेश बिल्डींग, घर नं 773 ,खांदाड, ता.माणगांव, जि.रायगड, मो.नं. 9339777777 समक्ष फिर्याद लिहून देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई वडिलांसह राहत असुन माझी पत्नी व मुलगी असे खारघर येथे राहतात. पत्नी व मुलगी खादांड येथे येवून जाऊन असतात. माणगांव व गोरेगांव येथे आमची किराणा मालाची दुकाने आहेत. माणगांवचे दुकान माझा भाऊ रूपेश चालवतो तर गोरेगांव ता.माणगांव येथील किराणा दुकान मी चालवतो. माणगांव येथील आमच्या दुकानाच्या बाजूला आमचा एक गाळा मी श्री.प्रविण पिसाट, रा.माणगांव यांना वापरायला दिला होता. तो गोळा प्रविण पिसाट याने चणेवाला श्री.जावरे यांना चालवायला दिला. परंतु मला गाळ्याची आवश्यकता असल्याने मी श्री.पिसाट यांना मार्च 2022 या महिन्यात भेटून माझा गाळा खाली करून देण्यास सांगितले होते. त्यानंतर एप्रिल महिन्यामध्ये चणेवाले श्री.जावरे यांच्या त्या गाळयात काहीतरी चोरी झाली. त्याबाबत माणगांव पोलीस ठाण्यांत त्यांनी गुन्हा दाखल केला आहे. त्या गुन्हयाचा तपास महिला पोलीस श्रीमती जाधव, माणगांव पोलीस स्टेशन या करीत आहेत. माझा चोरीशी काहीएक संबध नसताना मला या गुन्हयात आरोपी केले. त्यात मी मा.कोर्टातून अटकपुर्व जामिन मिळविण्यासाठी अर्ज केला. तेंव्हा मला मा. न्यायालयाने आंतरिम जामिन मंजूर केला होता. त्यावेळी मा.न्यायालयाने मला माणगांव पोलीस ठाण्यांत हजेरी देण्यांस सांगितले आहे. त्याप्रमाणे मी दिनांक 09/05/2022 रोजी पोलीस ठाण्यांत हजेरीस गेलो होता. तेंव्हा महिला पोलीस श्रीमती कुंजन जाधव यांनी मला सांगितले की, तुम्हाला तपासात मदत करून या गुन्हयातून मी काढू शकते. त्यासाठी तुम्ही मला एक लाख रूपये दया. आम्हाला साहेबांना पण दयावे लागतात असे सांगितले. व लाचेची मागणी केली. त्यानंतर मी माणगांव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक साहेबांना भेटलो परंतू त्यांनी माझेकडे कोणत्याही प्रकारे लाचेची मागणी केली नाही. यावरून माझी खात्री झाली की माझेविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयात तपासात मला मदत करून गुन्हयातून मला काढून टाकण्यासाठी श्रीमती कुंजन जाधव, महिला पोलीस माणगांव पोलीस ठाणे या एक लाख रूपये लाचेची मागणी करीत आहेत. परंतू मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांचेवर कारवाई करणेसाठी मी दि. 26/05/2022 रोजी इंदापूर ता.माणगाव, जिल्हा रायगड येथे पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांना भेटून त्यांचेकडे लेखी तक्रार दिली होती. पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी माझे तक्रारीवर समक्ष म्हणून सही केली. व मला माझे तक्रारीचे अनुषंगाने करावयाच्या कारवाई बाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी मला सुचना देवून पुढील कार्यवाहीकरता माणगाव रेल्वे स्टेषन येथे जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे श्रीमती सोनावणे मडम व सापळा पथकामधील अंमलदार हे शासकीय महिंद्रा बोलेरो जिप क्रमांक एम. एच.06-सीडी-1508 व मी माझे रयल इनफिल्ड बुलेट मोटारसायकल क्रमांक एमएच-06-सीए-9595 ने माणगाव रेल्वे स्थानका समोर येवून थांबलो. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी दोन पंच बोलावून घेतले. याप्रमाणे 1) श्रीमती प्रज्ञा पांडुरंग शिंदे,आशा गटप्रवर्तक, प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापुर, ता.माणगांव, 2) श्री.मनोज प्रभाकर साळवे, कनिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम उप

विभाग, रोहा, असे पंच हजर झाले. श्रीमती सोनावणे मडम यांनी पंचाना त्यांची ओळख देवून त्यांचे नाव व हुदद्दे यांची विचारणा केली. तसेच सापळा केसमध्ये पंच साक्षीदार म्हणून काम करणेस तयार आहेत का? असे विचारले असता त्यांनी संमती दर्शविली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी माझी दोन पंचांशी, एसीबी कडील पथकाशी ओळख करून दिली. त्यानंतर श्रीमती सोनावणे मडम यांचे सुचनेप्रमाणे मी माझी सविस्तर तक्रारीची हकीगत दोन्ही पंचांना तोंडी सांगीतली. त्यानंतर श्रीमती सोनावणे मडम यांनी माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांस वाचावयास दिली. ती त्यांनी वाचून पाहीली. सदर तक्रार व मी सांगितलेली हकीगतीप्रमाणे असल्याची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचांनी श्रीमती सोनावणे मडम यांचे सूचनेप्रमाणे त्या तक्रारीवर सहया केल्या त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेसाठी, माझी व पंच साक्षीदार यांची वक्तव्ये डिजिटल व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतले. त्यानंतर सोनावणे मडम यांनी मला तसेच पंच साक्षीदार व सापळा पथकामधील अंमलदार यांना सुचना दिल्या. त्यानंतर माझे तक्रारीची पडताळणी करणे करीता, माझेकडे व्हईस रेकर्डर देवून मी, आणि पंच साक्षीदार श्रीमती प्रज्ञा शिंदे असे माझे बुलेट मोटारसायकल नंबर एम.एच.06 सीए/9595 ने माणगांव पोलीस ठाण्यामध्ये ठाणे अंमलदार कक्षामध्ये जाऊन 14.52 ते 15.30 वा.चे दरम्यान महिला पोलीस नाईक श्रीमती कुंजन जाधव यांची समक्ष भेट घेतली व लोकसेवक श्रीमती जाधव यांचेशी माझेविरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक श्रीमती जाधव यांनी माझेकडे एक लाख रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती नव्वद हजार रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम लगेच घेवुन येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच श्रीमती शिंदे असे माझे मोटारसायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. पडताळणीचे वेळी माझेत व लोकसेवक श्रीमती जाधव यांचेत समक्ष भेटीत झालेले संभाषण व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक, श्रीमती सोनावणे मडम यांनी सांगितले की, सदर संभाषणावरून लोकसेवक श्रीमती कुंजन जाधव, महिला पोलीस नाईक पोलीस माणगांव पोलीस ठाणे यांनी मला गुन्हयाचे तपासात मदत करून गुन्हयातून काढून टाकण्यासाठी पुर्वी मागणी केल्याप्रमाणे एक लाख रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 90000/- रूपये लाचेची मागणी करून लाचेची रक्कम लगेच घेवून येण्यास सांगितल्याने पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे यांनी श्रीमती कुंजन जाधव, महिला पोलीस, माणगांव पोलीस ठाणे यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी लाचेची रक्कम 90,000/- रूपये हजर करण्यास सांगितल्याने मी लाचेची रक्कम 90,000/- रू. हजर केली. त्याप्रमाणे माणगांव रेल्वे स्टेशन समोर शासकीय बोलरो जीपमध्ये सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली. त्यानंतर मी सापळा कारवाईकरता माझी व पंच साक्षीदार यांची वक्तव्ये डिजिटल व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतले. त्यानंतर सोनावणे मडम यांनी मला तसेच पंच साक्षीदार व सापळा पथकामधील अंमलदार यांना सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे सापळा कारवाईकरीता व्हाईस रेकर्डर व लाचेच्या रकमेसह मी, व पंच श्रीमती शिंदे असे माझ्या बुलेटने माणगांव पोलीस ठाण्यामध्ये ठाणे अंमलदार कक्षामध्ये 16.33 ते 17.15 वा. चे दरम्यान लोकसेवक श्रीमती जाधव यांची भेट घेवून त्यांचेशी माझे विरूध्द दाखल असलेल्या गुन्हयाचे अनुषंगाने चर्चा केली. त्यावेळी लोकसेवक श्रीमती जाधव यांनी हाताचे इशायाने माझेकडे लाचेची मागणी केली. मी लोकसेवक श्रीमती जाधव यांना लाचेची रक्कम आणली असल्याचे सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्रीमती जाधव यांनी मला डेपोमध्ये त्यांचे पती धर्मेशला भेटण्यास सांगितल्याने मी व पंच श्रीमती शिंदे असे माझे मोटास सायकलने माणगांव रेल्वे स्टेशन समोर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवून श्रीमती सुषमा सोनावणे मडम यांना भेटलो. सदर वेळी माझेत व लोकसेवक श्रीमती जाधव यांचेत समक्ष भेटीत झालेले संभाषण व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी सांगितले सदर संभाषणावरून लोकसेवक श्रीमती जाधव यांनी माणगांव एस.टी.डेपो मध्ये जावून लोकसेवक श्रीमती जाधव यांचे पती यांना भेटयास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे मडम यांनी लोकसेवक श्रीमती जाधव यांचे पती श्री.धर्मेश यांचेविरूध्द माणगावं एस.टी.डेपो येथे सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे मी सापळा कारवाईकरीता व्हाईस रेकर्डर व लाचेच्या रकमेसह मी, व पंच श्रीमती शिंदे असे माझ्या बुलेटने माणगांव एस.टी.डेपोमध्ये जावून 17.47 ते 18.04 वा. दरम्यान धर्मेश यांची भेट घेतली असता श्री.धर्मेश यांनी लाचेची रक्कम न स्विकारता मला नंतर फोन करतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच श्रीमती शिंदे असे माझे मोटास सायकलने माणगांव रेल्वे स्टेशन समोर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत येवून श्रीमती सुषमा सोनावणे मडम यांना भेटलो. सदर वेळी माझेत व लोकसेवक श्रीमती जाधव यांचेत समक्ष भेटीत झालेले संभाषण व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे यांचे सुचनेवरून मी 20.00 वाजता लोकसेवक श्रीमती जाधव यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क साधला असता त्यांनी मला माणगाव पोलीस स्टेषनला येवुन साहेबांषी बोलण्यास सांगितले. सदरचे संभाषण व्हाईस रेकर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे मडम यांनी लोकसेवक श्रीमती कुंजन जाधव व पोलीस निरीक्षक माणगाव पोलीस ठाणे यांचेविरूध्द माणगांव पोलीस ठाणे येथे सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. सापळा कारवाईकरीता व्हाईस रेकर्डर व लाचेच्या रकमेसह मी, व पंच श्रीमती शिंदे असे माझ्या बुलेटने माणगांव पोलीस ठाण्यामध्ये जावून 20.04 ते 20.16 वा.चे दरम्यान लोकसेवक श्रीमती जाधव व पोलीस निरीक्षक माणगांव पोलीस ठाणे यांची भेट लोकसवेक श्रीमती जाधव अगर पोलीस निरीक्षक माणगांव पो.ठाणे यांनी माझेकडून लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे मडम यांनी कारवाई स्थगित करण्याचा निर्णय घेवून लोकसेवक श्रीमती जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्यावर सापळा आजमाविण्याची कारवाई करण्याचे ठरविले. मी लोकसेवक यांचेविरूध्द तक्रार देताना लोकसेवक यांचे नाव श्रीमती किंजल जाधव असलेबाबत सांगितले होते. परंतु तक्रारदार यांनी पडताळणीचे वेळी समक्ष भेटीच्या दरम्यान त्यांचे गणवेषावरील नावाची पाटी वाचली असता लोकसेवक यांचे नाव कुंजन जाधव, पोलीस नाईक असे असल्याचे सांगितले आहे. पडताळणी पासुन दिनांक 23/06/2022 रोजीपर्यंतचे कालावधीत लोकसेवक श्रीमती कुंजन जाधव पोलीस नाईक या लाचेच्या रक्कमेसंदर्भात मला भेटल्या नाहीत अगर त्यांनी माझेशी संपर्क केलेला नाही. त्यामुळे आता सदर प्रकरणात लोकसेवक श्रीमती कुंजन जाधव हया माझेकडून लाचेची रक्कम स्विकारतील असे मला वाटत नाही, परंतू तक्रारीचे केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक श्रीमती कुंजन जाधव यांनी माझेकडे लाचेची मागणी केलेली आहे. म्हणून त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मी विनंती मी पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांना केली. त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी दिनांक 23/06/2022 रोजी माझा जबाब नोंदवून घेतला. अशा रितीने माझे विरूध्द माणगाव पोलीस ठाण्यामध्ये दाखल असलेल्या चोरीच्या गुन्हयामध्ये मला मदत करून बाहेर काढण्यासाठी पंच साक्षीदार यांचे समक्ष दिनांक 26/05/2022 रोजी केलेल्या पडताळणी वेळी लोकसेवक श्रीमती कुंजन जाधव यांनी माझेकडे 1 लाख रूपये लाचेची मागणी करून 90,000/- रू. लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्रीमती कुंजन जाधव, पोलीस नाईक, नेमणूक माणगाव पोलीस ठाणे यांचेविरूध्द फिर्याद आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Rajendra Pandurang Patil(I (Inspector)) / DGPEPPM73 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Rajendra Pandurang Patil
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPEPPM73

पोलिस निरीक्षक
माणगांव - रायगड

ठाणे अमलदार
माणगांव पोलीस ठाणे

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) 1 | Sex (लिंग) 2 | Date/Year of Birth (जन्म 3 | Build (बांधा) 4 | Height (cms.) (उंची 5 | Complexion (रंग) 6 | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) 7 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities 8 | Teeth (दात) 9 | Hair (केस) 10 | Eyes (डोळे) 11 | Habit(s) (सवयी) 12 | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) 13 |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**